# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२१००/१८८/११०

संकेतस्थळ : www.msbte.ac.in ई-मेल : secretary@msbte.ac.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. मरातंशिमं/का-४३/२०२५/६८ दिनांक: 07 FEB 2025

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका
अभ्यासक्रम राबविणाऱ्या मंडळाशी संलग्नित सर्व संस्था

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम व थेट द्वितीय वर्षात K-scheme मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे Academic Bank of Credits (ABC ID) तयार करणे बाबत..**

मंडळाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP-२०२०) च्या अनुषंगाने नविन पाठ्यक्रम (K-scheme) तयार करुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासुन अंमलबजावणी केली आहे. सदर शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांची Academic Bank of Credits (ABC) करिता नोंदणी करणे अनिवार्य आहे. मंडळाशी संलग्नित सर्व संस्थांमधील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीत प्रथम व थेट द्वितीय वर्षात K-scheme मध्ये नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांचे ABC Id तयार करण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) ABC Id प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता संस्थास्तरावर अभ्यासक्रमनिहाय एका अधिव्याख्यात्याची नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करावी.

२) सर्व AICTE मान्यताप्राप्त संस्थेने **www.msbte.ac.in** या मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर **STUDENT ACTIVITIES टॅब मधील ABC ID Creation Portal (Only for AICTE Institutes)** या लिंकवर जाऊन Institute Log In मध्ये संस्था क्रमांक व प्रिन्सिपॉल इमेलवर प्राप्त झालेला डिफॉल्ट पासवर्डचा वापर करून लॉगिन करावे. संस्थेचे लॉगिन केल्यानंतर **Enrolled Student List** या टॅबमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले विद्यार्थ्यांचे पासवर्ड प्रत्येक विद्यार्थ्याला गोपनीयरित्या वाटप करावे.

३) संस्थेच्या उपरोक्त लॉगिन मध्ये उपलब्ध यादीतील सर्व विद्यार्थ्यांनी www.msbte.ac.in या मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर STUDENT ACTIVITIES टॅब मधील ABC ID Creation Portal(Only for AICTE Institutes) या लिंकवर STUDENT LOG IN मध्ये जाऊन Enrollment नंबर व संस्थेकडून प्राप्त झालेला पासवर्डचा वापर करून नोंदणी करावी व वयक्तिक माहिती, आधार माहिती अद्ययावत करून ABC Id तयार करावा.

४) ABC ID Creation Portal(Only for AICTE Institutes) चा वापर समजून घेण्यासाठी विद्यार्थी व संस्थांसाठी सोबत जोडलेल्या ABC ID Guideline Manual चा उपयोग करावा.

५) ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी Digilocker चा वापर करून ABC ID तयार करून घेतला असला तरी अशा सर्व विद्यार्थ्यांना ABC ID Creation Portal(Only for AICTE Institutes) या लिंकवर जाऊन स्वत:ची नोंदणी करुन वयक्तिक माहिती, आधार माहिती अद्ययावत करून ABC Id तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण करणे

आवश्यक आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांचा यापूर्वी तयार केलेला ABC ID विद्यार्थ्यांच्या Enrollment सोबत जोडला जाईल. अशा सर्व विद्यार्थ्यांना "ABC ID Already Exist" असा मेसेज प्राप्त झाल्यावर नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईल.

६) विद्यार्थ्यांचा ABC Id निकालासोबत संलग्न करण्यात येणार आहे व त्यानुसार विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका मंडळाद्वारे Digilocker वर अपलोड करण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा ABC Id अत्यंत अचुकतेने तयार करून घेणे आवश्यक आहे.

तरी सर्व संस्थानी सदर प्रक्रिया दि. २५.०२.२०२५ पर्यंत पुर्ण करावी. याबाबत तांत्रिक अडचणी आल्यास विभागीय कार्यालयास संपर्क साधावा. उपरोक्त प्रक्रियेनंतर विद्यार्थ्यांचे तयार झालेले ABC ID सदर पोर्टलद्वारे मंडळाकडे एकत्रितरित्या प्राप्त होणार असल्याने संस्थांनी आपल्याकडील ABC ID ची माहिती मंडळाकडे पाठवण्याची आवश्यकता नाही.

**(उमेश टे. नागदेवे)**
**सचिव**
**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई**

प्रत :

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१ यांना माहितीस्तव सादर.

२) उपसचिव, म. रा. तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय- मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजी नगर यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता